|| अल्पारंभ: क्षेमकर: ||

SWS Financial Solutions Pvt. Ltd.
Comprehensive Financial Consultancy & Services

Head Office : 2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle,
Near Hotel Curry Leaves, Gangapur Road, Nahik 422013

# गवाक्ष
......एक विचारमंच ! आर्थिक साक्षरतेसाठी

AMFI Registered Mutual Fund Distributor : ARN-90746


## ऑगस्ट २०२४ विशेषांक : "आर्थिक फसवणुक आणि दक्षता"



**श्री. रघुवीर अधिकारी,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

वाचकहो नमस्कार !!

नुकतेच UNGA (United Nations General Assembly) चे अध्यक्ष श्री. डेनिस फ्रान्सिस यांनी भारताच्या डिजिटल क्रांतीबद्दल आणि देशाच्या ग्रामीण भागात बँकिंग सेवांचा विस्तार करण्यावर लक्ष केंद्रित केल्याबद्दल आपल्या देशाची भरभरून प्रशंसा केली आहे. त्यांनी म्हंटले आहे की गेल्या पाच ते सहा वर्षांत ८० कोटी भारतीयांना फक्त स्मार्टफोनच्या वापरामुळे गरिबीतून बाहेर काढण्यात आले आहे. ही आपल्या देशाच्या उज्वल आर्थिक भवितव्याची नांदी जरी असली तरी हे होत असतानांच, नवीन स्मार्टफोन वापरकर्त्यांना फोनच्या सुरक्षित वापरासाठी आर्थिक साक्षरतेचे धडे देणे तितकेच महत्वाचे वाटते.

जानेवारी २०२० ते जून २०२४ पर्यंत देशातील ७५ टक्क्यांहून अधिक सायबर गुन्ह्यांमध्ये आर्थिक फसवणुकीचा वाटा होता. यातजवळपास ५० टक्के प्रकरणे UPI आणि इंटरनेट बँकिंगशी संबंधित आहेत. वर्तमानपत्रे वाचतांना, ग्राहाकांचे अनुभव ऐकतांना याबाबतचे नवनवीन प्रकार समजत आहेत. जसे नामांकित संस्थांच्या नावाचा वापर करून ग्राहकांना स्कॅम कॉलिंग करणे किंवा बनावट मेसेज पाठवून UPI पेमेंट करण्यास भाग पाडणे इ. यामध्येही तरुण वर्ग, स्त्रिया यांना जास्त टारगेट केले जाते आहे.

**तेव्हा "गवाक्ष" चा हा अंक "आर्थिक फसवणुक आणि दक्षता" या संकल्पनेवर आधारित आहे. काही ग्राहकांचे अनुभव शेअर करत आहोत जेणेकरून आपल्या कोणाच्याही बाबतीत असा प्रकार घडणार नाही याची काळजी आपण घेऊ शकू. सायबर शिक्षित व्हा, हे ज्ञान इतरांपर्यंतही पोहोचवा आणि आपल्या देशाच्या उज्वल आर्थिक भवितव्याच्या नांदीचे रूपांतर सत्यात प्रतीत करण्याच्या प्रयत्नात जरूर सहभागी व्हा !!**

## स्कॅम कॉलिंग: माझा अनुभव



**कु. शताक्षी रिसबुड**

नमस्कार! मी, नाशिकमध्ये राहणारी कु. शताक्षी हेमंत रिसबुड. मला तुमच्यासोबत, आर्थिक फसवणूकीच्या बाबतीत मला आलेला एक अनुभव शेअर करायचा आहे.

२३ जुलै २०२४ रोजी, मला राहुल शर्मा या नावाने फोन आला. मी फोन उचलल्यानंतर राहुल बोलू लागला. "नमस्कार. मी LIC मधुन बोलतो आहे. हेमंत सरांच्या नावे रु. १२,००० चे पेमेंट करायचे आहे. त्यांनी नुकताच तुमचा नंबर दिलेला आहे आणि तुमच्याशी बोलायला सांगितले आहे. तुमचा हा मोबाईल नंबर गुगल पे साठी रजिस्टर आहे का? मी पैसे ट्रान्सफर करतो. "

खरे तर, माझे वडिल श्री. हेमंत रिसबुड, यांचे २०२० मध्ये कोव्हिड कालावधीत निधन झालेले आहे. त्यामुळे असा फोन येताच मी सावध झाले.

राहुलने बोलतांना माझी सगळी चौकशी केली. माझा ईमेल वगैरे सगळे एकदम बरोबर सांगून पेमेंट मला जमा केल्याचे सांगितले. लगोलग मला एक साधा टेक्स्ट मेसेज आला. त्यावर 'रु. १०, ००० जमा झाले आहेत', असा मजकूर होता. माझ्या लक्षात आले की हा मेसेज मला माझ्या नेहेमीच्या बँकेकडून आला नव्हता. एका अनोळखी नंबर वरुन तो आला होता. राहुलचा पुन्हा फोन आला. "मॅडम, उरलेले रु. २, ००० ट्रान्सफर करण्याच्या प्रयत्नात माझ्याकडून चुकून रु. २०, ००० ट्रान्सफर झाले आहेत. तेव्हा आता तुम्ही मला रु. १८, ००० परत ट्रान्सफर करा. मी QR कोड पाठवतो आहे. ". लगेच त्याचा QR कोड दर्शविणारा मेसेजही आला.

काही महिन्यांपूर्वीच मला माझ्या मामांनी फोन करून, अशी हुबेहूब फसवणूक माझ्या चुलत बहिणीच्या बाबतीत कशी झाली ते सांगितले होते. राहुलचा फोन, पैसे क्रेडिट झाल्याचे दर्शविणारा बनावट मेसेज यावरून मला ते सगळे आठवले. माझ्या बहिणीचे पैसे त्यावेळी लुटले गेले होते. आणि 'वडिलांनी फोन करायला सांगितले आहे', असे राहुल म्हणताच माझ्या लक्षात आले होते की हा फ्रॉड कॅाल आहे. मग मी तो नम्बर ब्लॉक केला आणि राहुलने सांगितलेल्या पुढील स्टेप्स काही घेतल्या नाहीत. मला आधी माहित असलेल्या फसवणूक घटनेच्या ज्ञानास अनुसरून मी माझी फसवणूक टाळू शकले.

वाचकहो, हा अनुभव तुमच्यासोबत शेअर करण्याचे कारणच हे वाटते की असे फोन तुम्हालाही येउ शकतात. तेव्हा कृपया दक्षता घ्या, अशा कॅालला बळी पडु नका आणि आपल्या कष्टार्जित धनाचे रक्षण करा.

## ऑनलाईन पेमेंट: नवीन फसवणूक प्रकार



**डॉ. आशिष रानडे,**
**संस्थापक, कलाश्री संगीत गुरुकुल**.

नमस्कार. मी डॉ. आशिष रानडे, गायक आणि संस्थापक, कलाश्री संगीत गुरुकुल, नाशिक. आमच्या संगीत गुरुकुलामध्ये अनेक विद्यार्थी गाण्याचे शिक्षण घेण्यास येत असतात. सध्या मोठया प्रमाणात चालणारे आर्थिक फसवणुकीचे प्रकार बघता, या संदर्भात मला आलेला एक अनुभव तुमच्याबरोबर शेअर करू इच्छितो जेणेकरून तुमच्या बाबतीत जर असा काही प्रकार झाला तर तुम्ही योग्य ती दक्षता घेऊ शकाल!

आज 'मला गाणे शिकायचंय' असा एका नम्बरवरून मला मेसेज आला. मेसेंजर अँपवरच त्या व्यक्तीने वर्गासंबधी सर्व चौकशी केली आणि फी बद्दल विचारले. मी ती माहिती देताच मला माझ्या Google Pay अँपवर फीच्या रक्कमेच्या जवळपास दुप्पट रक्कमेचा आकडा आला.

मी काळजीपूर्वक तपासले असता तो आकडा अँपच्या मेसेज (Chat) स्वरूपातला आकडा असून, पेमेंट रक्कमेचा आकडा नाही हे माझ्या लक्षात आले. त्या व्यक्तीने पुन्हा, Google Pay अँपवर 'Payment Done' असा नवीन मेसेजही मला केला. आणि चॅटवरच मला अनेकदा मेसेज करत राहिला की Advance Payment चुकून जास्त केले गेलेय तेव्हा मला निम्मी रक्कम परत करा!! मला आलेला मेसेज ही चॅट मेसेजमधील रक्कम आहे हे लक्षात आलेच होते. तथापि मी त्या व्यक्तीस, 'बँक अकाउंट चेक करुन सांगतो' असे सांगून दूर ठेवायचा प्रयत्न केला. पण त्याने खूपदा विचारणा केली. नंतर त्याची बोलण्याची भाषाच बदलली. पण मी 'बँकेत रक्कम जमा झालेली नाही', असे सांगत माझ्या मतावर ठाम राहिलो. अखेर त्या व्यक्तीस लक्षात आले की आपली काही डाळ शिजत नाहीये आणि तो प्रकार शेवटी थांबला.

पण त्यावेळी मी घाईत असतो आणि मेसेज चॅट स्वरूपात आहे हे लक्षात आले नसते तर कदाचित मी त्या रक्कमेचे पेमेंट करून टाकले असते. परंतु 'बँक खात्यात पैसे जमा झाल्याशिवाय कोणताही व्यवहार कन्फर्म करू नये', हे माझे सवयीचे धोरण कामात आले आणि माझी आर्थिक फसवणूक टळली!! तेव्हा ऑनलाईन पेमेंट घेणाऱ्यांनी सतर्क रहाणे कसे आवश्यक आहे हे सांगण्यासाठी हा लिखाण प्रपंच. Take Care, Avoid Financial Frauds.



## छंदाचाही फंदा : नाणीसंग्रहण छंद आणि आर्थिक फसवणूक



**डॉ. रुपाली कुलकर्णी,**
**IT & Content Head, SWS**

**दुर्मिळ, पुरातन नाण्यांचे संकलन**, हा जगभरातील अनेकांना आवडणारा एक छंद! हा छंद जोपासण्यामागे दुर्मिळ नाणी शोधण्याचा थरार, संग्रह पूर्ण केल्याचा आनंद आणि या धातूच्या छोट्या तुकड्यांमध्ये गुंफलेले इतिहासाचे कौतुक ही काही आकर्षणे असतात. संग्राहक सहसा नाण्यांबद्दल असणाऱ्या सामान्य कुतूहलाने त्यांचा संग्रह करण्यास सुरुवात करतात. मग नंतर ऐतिहासिक, देशोविदेशीची नाणी जमविणे किंवा त्यांचे दुर्मिळ तुकडे शोधण्याचा त्यांना ध्यास लागतो! संग्राहक व्यक्ती / समूहास पुरातन नाणी देण्याच्या बदल्यात ती पुरविणाऱ्या व्यक्तीस चांगलाच आर्थिक मोबदला मिळू शकतो. मग अशी उच्च मोबदला मूल्याची क्षमता असणारी नाणी जमविणे हा एक आकर्षक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर छंद (की व्यवहार / व्यवसाय ??) बनत जातो!

काही भामटी मंडळी दुर्मिळ नाण्यांच्या संदर्भात युट्युब वर दिशाभूल करणारे व्हिडिओ टाकत असतात. या व्हिडिओमध्ये, ही दुर्मिळ नाणी दाखवून झाल्यावर, 'तुमच्याकडे जर काही पुरातन नाणी असतील तर त्यांचा फोटो शेअर करा, आम्हाला ती विका आणि बदल्यात भरघोस मोबदला मिळवा', असे आवाहन केले जाते. मग अज्ञानापायी (आपल्याकडचे नाणे दुर्मिळ आहे, हे अज्ञान), अशी नाणी जवळ असणारे लोक त्या युट्युबरशी संपर्क करतात. आपल्याकडील नाण्यांचे फोटो पाठवितात. नाणी खरेदीदारास पसंत पडतात (म्हणजे पसंत आहेत असे भासविले जाते) आणि मग सुरु होतो आर्थिक लुबाडणुकीचा खेळ. घासाघीस करून सौदा ठरतो. सौद्यात ठरलेली रक्कम देण्यासाठी, तो बोगस खरेदीदार, बनावट कंपनीत, विक्रेत्यास रेजिस्ट्रेशन करण्यास सांगतो आणि समोरच्यांकडून रेजिस्ट्रेशन फी उकळतो! नाणी विकणाराही, नंतर मिळणाऱ्या मोठ्या रकमेच्या आमिषापायी हे रेजिस्ट्रेशन करतो. या रेजिस्ट्रेशन व्यवहारांदरम्यान, खरेदीदार विक्रेत्याकडून त्याची बँक अकाउंट डिटेल्स, फोन नंबर इ. माहिती मिळवतो. आणि मग अमुक एका (बनावट) लिंकवर क्लिक करा आणि सौद्याची रक्कम घ्या असे सांगणारे मेसेजेस विक्रेत्याच्या मोबाईलवर येऊ लागतात. मिळेल ती रक्कम पदरी पडून घेण्याच्या घाईत, विक्रेता पद्धतशीरपणे लुबाडला जातो. या लिंकवर क्लिक केल्याने विक्रेत्याच्या मोबाईल स्क्रीनला वाचणारी सॉफ्टवेअर्स त्याच्या मोबाईलवर नकळत इन्स्टॉल होतात आणि बँकेचे OTP, पासवर्ड्स वाचून हे भामटे विक्रेते त्यांच्या खात्यातून पैसे पळवितात.

असे प्रकार पाहता, आर्थिक लुबाडणूक टाळण्यासाठी नाणी संग्राहकांनी सजगता दाखविली पाहिजे. पुढील काही मुद्दे लक्षात लक्षात घेणे जरुरी आहे.

१) आर्थिक व्यवहार करतांना, खरेदीदाराचा अचूक स्रोत, अधिकृतता आणि माहितीशिवाय आर्थिक व्यवहार करणे टाळले पाहिजे.
२) नवशिक्या संग्राहकांनी, विकत घेत असलेल्या नाण्यांच्या अचूक मूल्यांकनासाठी आग्रही राहिले पाहिजे. त्यासाठी योग्य तो अभ्यास केला पाहिजे. विक्रेत्याने फुगवून सांगितलेल्या मूल्यांकनाला भुलून केलेली खरेदी ओव्हर प्राईज्ड पडू शकते.
३) मौल्यवान धातूंच्या बाजारपेठेतील भावांच्या बदलांमुळे नाण्यांच्या मूल्यात चढ-उतार होत असतात. म्हणजे ज्या नाण्यांचे एकेकाळी उच्च मूल्य होते त्यांची किंमत कमी होऊ शकते किंवा याच्या अगदी उलटही होऊ शकते. म्हणून खरेदी-विक्री करताना बाजारपेठेतील चालू भावांचा अभ्यासही गरजेचा आहे.
४) संग्राहक कधीकधी गुंतवणूक म्हणून नाणी खरेदी करतात आणि त्यांची किंमत कालांतराने वाढण्याची अपेक्षा करतात. तथापि, असे होईलच असे नाही. योग्य माहिती नसताना केलेली 'सट्टा' गुंतवणूक निराशा आणि आर्थिक नुकसान पदरी पाडू शकते.
५) ऑनलाइन नाणी खरेदी अथवा विक्री करताना, योग्य संरक्षण देणाऱ्या सुरक्षित पेमेंट पद्धतीचा वापर केला पाहिजे. वायर ट्रान्सफर किंवा इतर असुरक्षित पेमेंट पद्धती ज्यामध्ये व्यवहाराचा माग पुनर्प्राप्त करणे कठीण आहे ते करणे टाळावे.
६) अधिकृत स्त्रोतांकडूनच खरेदी / विक्री केली पाहिजे. मान्यताप्राप्त संस्थां ज्यांच्याकडे नैतिकता आणि मानके असतात तिथेच व्यवहार करणे उत्तम!

**तेव्हा यशस्वी नाणे संकलनाचा आनंद हा केवळ दुर्मिळ नाणी जमविण्यातच नाही तर माहितीपूर्ण आणि विवेकपूर्ण निर्णय घेण्यातही आहे. अशाप्रकारे काळजी घेतली की मग या छंदातून आनंदाचीच निर्मिती होईल, नुकसान/ क्लेश किंवा पश्चातापाची नाही!!**

## आमच्या बद्दल थोडेसे...

**SWS: आमचा प्रवास**

आर्थिक सल्ला व गुंतवणूक क्षेत्रातील आमचा प्रवास १९९५ पासून सुरु आहे. या क्षेत्रातील सर्व सेवा, ग्राहकांना एकाच छत्राखाली उपलब्ध व्हाव्यात, या उमद्या हेतूने संस्थेचा प्रवास सुरु झाला. सोपी, ग्राहकाभिमुख, पारदर्शी आणि विश्वासाहार्य सेवा ही आमची वैशिष्टये असून आज संस्था व्यावसायिक उत्कृष्टतेचे प्रतीक म्हणून ओळखली जाते आहे. जोडल्या गेलेल्या ग्राहकांना आर्थिक साक्षरतेकडून, आर्थिक स्वातंत्र्यापर्यंत नेण्यासाठी, आमची अनुभवसंपन्न टीम, सदैव प्रामाणिकपणे कार्यरत आहे !

**आमच्या सेवा:**

- आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर ( जन्म, शिक्षण, विवाह, सेवानिवृत्ती,वारसाहक्क इ.) आवश्यक असणाऱ्या गुंतवणूक सेवा: म्युच्यअल फंड्स, इक्विटी मार्केट, कॉर्पोरेट फिक्सड डिपॉसिट्स इ. च्या माध्यमातून
- जीवन विमा, वाहन, आरोग्य आणि अपघात विमा
- करनियोजन आणि कर्ज सेवा
- व्यवसाय किंवा इतर विशिष्ट हेतूं संदर्भात आर्थिक गुंतवणूक सल्ला, सेवा

**आमची वैशिट्ये:**

- ३० वर्षांचा प्रदीर्घ, संपन्न अनुभव, सेबी अधिकृत गुंतवणूक सल्लागार, AMFI नोंदणीकृत म्युच्युअल फंड वितरक
- CFA, CFP सारखी प्रमाणित शैक्षणिक पातळी आणि इंजिनीअरिंग, चार्टर्ड अकौंटन्सीसारखी पार्श्वभूमी असणारी अनुभवी आणि कार्यक्षम सल्लागारांची टीम
- विश्वासार्ह आणि निःपक्षपाती सल्ला
- वैयक्तिक तसेच संपूर्ण कौटूम्बिक, व्यवसाय, विश्वस्थ संस्था यांना सेवा देण्याचा संपन्न अनुभव
- सोपा, ग्राहकाभिमुख, पारदर्शी आणि नैतिक व्यवहार
- पुणे, मुंबई , नागपूर, वर्धा, कोल्हापूर आणि इतर उदोयन्मुख शाखा

व्यावसायिक उत्कृष्टते बरोबरच SWS संस्थेतील प्रत्येकजण आपले सामाजिक भान जपतो! संस्थेच्या सर्व समाजोपयोगी कार्याला अधिक संघटितरित्या आणि परिणामकारक स्वरूपात पुढे न्यावे हा विचार करून, २०१८ मध्ये 'अल्पारंभा एज्युकेशनल अँड कल्चरल फाउंडेशन' चा उदय झाला. समाजावर प्राथमिक परिणाम करणारी, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्र ही प्रामुख्याने विचारात घेतली गेली. या दोन्ही विषयांच्या कक्षेत कार्य करतांना, त्यातील विविध निकडी ओळखून, त्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना मदत करणे आणि समाजामध्ये अर्थ साक्षरता वाढावी यासाठी कार्य करणे ही अल्पारंभाचे प्राथमिक उद्दिष्ट्ये आहेत.

अधिक माहिती: **www.alparambha.com**. ब्लॉग : **https://alparambha.wordpress.com/**

---

॥ अल्पारंभ: क्षेमकर: ॥

**SWS Financial Solutions Pvt. Ltd.**

Comprehensive Financial Consultancy & Services


**AMFI Registered Mutual Fund Distributor: ARN-90746**

2nd Floor, Mandlik Pride, Jehan Circle, Gangapur Road, Nasik 13. Contact: 0253-2 975 975 / 75078 84477

**Website: www.swsfspl.com** **Blog: https://swsfspl.blogspot.com**

**Our Branches**

**Pune**
**Mr. Swapnil Ekande**
Office No.1, Anand Corner,
Anand Park, Wadgaonsheri,
Pune- 411 014.
Ph. 9828735055 / 7720099241
Email: swapnil@swsfspl.com

**Mumbai**
**Mr. Kishor Kale**
Shop No.6, , xDaulat Minar CHS Ltd.,
Opp. Thakkar Bakers, Shahaji Raje Marg,
Vile Parle East, Mumbai-400057
India.Ph. 9869239940 / 9224433122
Email: kishor@swsfspl.com

**Nagpur**
**Mr. Neeraj Adbe**
Flat F1, First Floor, Yogesh Complex,
Opposite Dhomne Jwelers, Pratap
Nagar Square, Nagpur 440022
Ph. 8308833724
Email: neeraj@swsfspl.com